कै. गणेश पांडुरंग टांकसाळे



चीफ् कंपाउंडर,

गव्हमेंट हॉस्पिटल,

पुणे, ठाणे.

लेखक

व

प्रकाशक



बाळकृष्ण गणेश टांकसाळे

जागतिक स्वरूपांत
शास्त्र-शुद्ध
आपली लिपि



लेखकः—बा. ग. टांकसाळे

माजी शिक्षक

छ. ल. प्रा. स्कूल, दादर, मुंबई.

प्रकाशकः—
बाळकृष्ण गणेश टांकसाळे
किर्लोस्करवाडी.

प्रथमावृत्ति ऑगस्ट १९४२

मुद्रकः—
रतनलाल डी. शहा, एम्. ए.
रत्नाकर प्रेस, सांगली.

जागतिक स्वरूपांत

शास्त्र शुद्ध

आपली लिपि

OUR SCRIPT

AS

THE WORLD SCRIPT

कांहीं महत्त्वाच्या खुणा

Tele printing आणि Automatic Composing या दोन गोष्टी जाहिरात-दृष्ट्या वृत्तपत्रांना आजच्या जाहिरातीच्या जगांत अत्यंत महत्त्वाच्या आहेत. आणि हें वरदान जगांतल्या हजारों लिप्यांपैकीं अेकट्या अेकच रोमन लिपीला मिळालें असूनसुद्धा आज तिला शुद्धीची अत्यंत निकड भासत आहे. मग लक्षांत घ्या...पण मी आता आपल्यापुढे नागरीचें अेक स्वरूप ठेवीत आहें तें पाहा. रोमन लिपीला नाक मुरडत नसाल तर हीहि लिपि तुह्मांला आवडलीच पाहिजे. हिचें लेखन हुबेहूब रोमन लिपीप्रमाणे तर आहेच. शिवाय (१) पूर्वीचेंच वळण व लिहिण्या-वाचण्याची पद्धत कायम ठेविली असून (२) कोणत्याहि बाबतींत रोमन अितकीच प्रभावी आहे. (३) अतिशय सुलभ तर आहेच; पण (४) त्याहूनहि शास्त्रशुद्ध आहे. केवळ चुणूक Spark दाखविण्यासाठींच या पुस्तकाचा जन्म आहे.

(१) ख, घ, छ, झ, ठ, ढ, ण, थ, ध, फ, भ, श, ळ, हे केठार वर्ण हवे असतील तेव्हा क, ग, च, ज, ट, ड, न, त, द, प, ब, स, ल, या कोमल वर्णांपुढें 'ह' ठेवावा. आणि (२) 'अ'कारी व्यंजनाचा पूर्ण उच्चार होत असेल तर त्यापुढे (आ, अि, अी, उ, ऊ, अित्यादींच्या ा, ि, ी, ु, ू अित्यादि Representatives प्रमाणे) 'अ' ठेवावा असे मुख्य दोन (बाकींचेसाठीं पुस्तकांतील विवेचन पाहा.)

नियम लक्षांत घेतले तर [(१) वर्णसंख्या २/५ कमी होते. (२) जोडाक्षरें नाहींशीच होतात]—तर साक्षरता प्रचार किता दूर आहे, सांगा.

उर्दू, रोमन आणि देवनागरी यांपैकीं कोणती लिपि हिंदी लोकांनी स्विकारावी हा अेक मोठाच प्रश्न आज हिंदुस्तानांतील लोकांना चालू महायुद्धापेक्षाहि अधिक भेडसावीत आहे—याच प्रश्नावर हिंदुस्तानचें सारें भवितव्य अवलंबून राहणार आहे; इतकेंच नव्हे तर हिंदुस्तानचा हा प्रश्न जमेस धरूनाहि हिंदुस्तानाबाहेर पाहूं जातां साऱ्या जगालाच आज अेकलिपीची—लिपिशुध्दीची अत्यंत जरूर भासत आहे असें दिसतें. आणि एवढ्याचसाठीं कांहीं दोष पतकरूनहि हें पुस्तक आज तातडीनें प्रसिध्द करीत आहें.

लिपि—शुध्दीच्या अंतिम स्वरुपाची आज केवळ तोंड—ओळख तरी व्हावी म्हणूनच कमींत कमी हजारबाराशे पानें व्यापणारा संसार अवघ्या ५० पानांत गुंडाळावा लागला. अशीच दुसरी महत्वाची गोष्ट परिस्थितीचा शिखंडी आड करून नाइलाजाने सांगावी लागत आहे, कीं आज प्रसिध्द होत असलेल्या स्वरुपांतच हें पुस्तक ११ वर्षांपूर्वी प्रसिध्द व्हायचें होतें; त्याची भूमिका तर १५ वर्षांपूर्वीच तयार झाली होती. परंतु त्यामुळेच आज 'तुमच्या मागे कोणता अनुभव आहे ?' असा प्रश्न, कोणीं विचारल्यास त्याला 'हीं मोलाचीं ११ वर्षें मीं त्यासाठींच (व्यर्थ) व्यतित केलीं आहेत ' असें उत्तर देण्याचा अधिकार मीं संपादन केला आहे. ६-६-७-७ वर्षांच्या बाळगोपाळांना ' श्रीगणेशा; ग, म, भ, न; अेकी अेक, दुरकी दोन ' शिकवण्यांत वल्बल ६ वर्षे खर्च केलीं तशींच डिग्रीयुक्त मराठी, गुजराथी, अिंग्रजी आणि ' विजापुरे ' अेवढ्या टाइपांचा प्रत्यक्ष कंपोझ करीत वृत्तव्यवसायांत २॥-३ वर्षें घालविलीं आहेत.

आपणहि अेकादी लिपि बनवावी असें वाटत असतांहि......

फक्त तीनच टाअिप जवळ असल्यामुळें (अितके देखील अेकेच ठिकाणीं मिळणें सहसा शक्य नसतें.) सध्या फक्त चारच भाषांचा समावेश करतां आला आहे.

धर्म, संस्कृति, पंथ, मतें, भाषा वगैरेवगैरे संबंधीं कोणाची अेक-वाक्यता होवो वा न होवो (तो या नंतरचा प्रश्न आहे) पण आधी अेकंदर जगाच्याच भवितव्याच्या दृष्टीने अेक–लिपि होणें अत्यावश्य आहे. 'अठरा जाती छत्तीस पंथ ' हिंदुस्थानने अिकडे दुर्लक्ष करून चालेल काय ?

मात्र, नागरीचें रो म न लि पी ला श ह म्हणून हें (या पुस्तकांत दाखविलेलें) रूपहि किंवा रोमन लिपि हीहि ' जागतिक लिपि (The World Script) ' होण्याला पुष्कळच असमर्थ आहेत, हेंहि मला येथेच सांगितलें पाहिजे.

नागपंचमी,

१६ आगस्ट १९४२.

बा. ग. टांकसाळे.

आगामी

चित्रकथा

(१) जातभाअी

(महायुद्धाच्या पार्श्वभूमीवर आधारलेलें अेक जागतिक सत्य)

(२) बेकारी

(अेका शास्त्रज्ञाच्या जीवनाचें विशेष चित्र)

(३) ओ

(स्त्री-जीवनाचें यथातथ्य स्वरूप)

(४) पुरस्कार

(अेका महत्त्वाच्या सामाजिक प्रश्नाचें अचूक उत्तर.
अेका हिंदविख्यात नटीच्या द्विभूमिकेसाठी)

विनोद्‌कथा

— अेका नव्या दृष्टिकोनांतून पाहिलेली भूमिका— बाळोबा

कविता—संग्रह

शिशु-गान

(शिशु आणि वर्ग १-२ करिता)

बिरबल आणि बादशाहा

अकबअर नावाचा ओक मउसअलमानी ी राजा ओका काळही ी बअराच लो ोकपरीय हो ोउउन गोला. तो ो सवअतःचया दहअररमा- ोतकोच दउसरयाचयाही दहअररमाचो रअकषअनह कअरी ी. तयाचया नअ-उउ परअदहाना'पा ोकी ी बीरबअल हा हीनदउ परअदहान तयाचा अतीसहअय आवअडता हो ोता. तयाची ी तहअटटा कअरावी ी महअनहउउन ओको दीवसही ी बादसहाहा तयाला महअनहाला, ' बीरबअल, काळ रातरी ी मी ी सवअपनात पाहीलो, की ी तउउ चीकहलात पअडला असउउन मी ी मातर मअदहात लो ोळहअत आहो. '

या सा'गनहयातला बादसहाहाचा होतउ ओ ोळहकहउउन नोहअमी ोपरअमानहोच चअटकअन बीरबअल महअनहाला, ' कहावीनद, माजहया सवअपनात मातर तउमही ी मअला चाटी ोत हो ोता नी ी मी ी तउमहाला चाटी ोत हो ोतो ो. '

बीरबअलाचया या चअतउरा- ोचया बो ोलनहयानो बादसहाहा पहारअच कहअजी ोळ जहाला.

બાદશાહ અને બિરબલ

अकबअर नामनो ो ओक मउसअलमानी ी राजा आगअलहना वअकहअतमा बअहउउज लो ोक-परीय तहअ- ी ी गअयो ो. ओ पो ोताना दहअररमपरअमानहोज बी ीजाना दहअररमनउ रअक-षअनह कअरतो ो हअतो ो. तोना नअव परअदहानमा बीरबअल हीनदउ परअदहान तोनो बअहउउज गअमतो ो हअतो ो. तोनी ी मअषकरी ी कअरवाना होतउतही ी ओँक दीवअस बादसहाहो कअहयउ, ‘बीरबअल कालो सवअपनमा मो जो ोयउ को तउउ कादअवमा पअडोलो ो हअतो ो अनो हउ मअदहमा आतहअडतो ो हअतो ो.’

बादसहाहअना कअहोवानउ होतउ सअमजहीनो हअममो-सहनी ी मापहअक बीरबअलो तअरतअज कअहयउ, ‘कहावीनद, मारा सवअपनमा मो जो ोयउ तो ो तअमो मअनो चाटता हअता अनो हउ तअमनो चाटतो ो हअतो ो.’

बीरबअलना चअतउरा- ी ी बहअरोला उततरतही ी बादसहाह ओकदअम नअरअम पअडी ी गअयो ो.

बीरबल और बादशाह

अकबअर नाम का ओक मउसअलमान राजा कीसी ी काल मो बअहउत लो ोक-परीय रअह चउका हा ी. वअह अपनो दहअररमको सअमानहीं दउउसरो' को दहअररमका रअकषअ-नह कअरता तहा. उसको नाउ मअनतरीयो ो' मो सो ओक बी ीरबअल तहा, यअह हीनदउ तहा आउर बादसहाह का बअहउत परीय तहा. ओक दीन उसकी ी ह ॅनसी ी कअरनो को ईरादो सो राजा बो ोला, 'बी ीरबअल, कअल रात को ो मा ीनो सवअपन मो दोकहा की तउम की ीचअड मो आउर मा ी सहअददह मो लो ोट रअहो हा ी.'

यअह सउनते ही बादसहाह का होतउ सअमअजह कअर बी ीरबअलनो जअवाव दीया, 'जअहा ॅपअनाह, मोरो सवअपन मो आप मउजहो चाट रअहो तहो आउर मा ी आपको ो.'

ब ीरिबअल को रअस-चअतउरा-ी ी बहअरो उततर को ो सउनकर बादसहाह बअहउत लअजजीत हउा.

ಬಿರಬಲ ಮತ್ತು ಬಾದಶಹಾ

अकबअर नोमब होसअरीन वअबब मउसअलमान अरअसअनउ हीनदअककी बअहअलह जअगअपरअसीददह नागी हो ोदअनउ. अवअनउ तअनन दहअररमवअनतोयो ओरअडनोयअवअर दहअररमवअननउ रअकषअनह माडउततीददनउ. अवअनअ वअमबअततउजअनअ परअदहानअरपा ोकी ो बीरबअल नोमब हीनदउ दहअररमद परअदहानअनउ बअहअलहो अवअनअ परी ोतीयअव नागीददनउ. अवअनअ चोषटोयअननउ माडबोकोनदउ वअनदउ दीवअस बादसहाहानउ बी िरबअललनीगो, ' बी िरबअलला, नानउ नीननो रातरअथअलली वअननउ कअनअसभननउ कअडोनउ. अदोनअनदअरो नी िनउ राडीयअलली हो ोरलहाडउततीददो वअनानउ जोनउतउपपदअलली हो ोरलहाडउततीदो.'

अी ि परअकार अननउव तअतव वअननउ तीलहीदउ नोहअमी ि परअकारदअनतो आगीनदागगो बी िरबअललनउ, ' मअहाराज, अदो वोलहोयअलली नअनअगो ोनदद कअनअसउ बीददीततउ. अदअरअलली नी िनउ नाननमअयअननउ मअततउ नानउ नीममअयअननउ नोककडततीददोवउ '

बी िरबअललनअ अी ि तअरअदअ माततननउ कोलही बादसहाहनीगो तउमबा नाहीरो उनटा- ित उ.

आजची घटका –

आजच्या घटकेला या जगांत ३०६४ भाषा चालू असून अेकट्या हिंदुस्तानांत ४८० बोलभाषा आणि १७९ लिप्या आहेत. परंतु...

दरेक क्षणाला जगांत अनंत घडामोडी होत आहेत, चंचल मानवांनी जड निसर्गाला कामाला लावल्यापासून 'मानव श्रेष्ठ की निसर्ग श्रेष्ठ?' असा प्रश्न खुद्द त्या जगन्नियंत्यालादेखील भेडसावीत असेल! आपला बुध्दिसागर मंथन करून आपण जड निसर्गाला कामाला लावलें तों तोच जड निसर्ग आपणांलाच निसर्ग-रूप करून टाकतो की काय हें आम्हां मानवांना कोडें पडलें तर नवल तें काय! स्त्री–पुरुष; लहान–मोठे; गरीब–श्रीमंत; बुद्धिजीवि–रूढि-प्रिय-गुलाम; जगाच्या कल्याणासाठी आत्मार्पण करणारे–केवळ जगण्यासाठीदेखील अज्ञानांत खितपत पडून आनंद मानणारे; अशा परस्पर विरुद्ध जोड्यांत इतकें महदंतर पडलें आहे, की उभयपक्ष जीव तोडून जागतिक स्वास्थ्याची आशा करीत आहेत, आणि तसें म्हटलें तर 'ही वेडी आशा तर नव्हे ना?' अशा शंकेने त्यांच्या मनांत घर केलें आहे. जगाच्या या फापट पसाऱ्यांत पावलों-पावलीं निरनिराळे पंथ, निरनिराळ्या जाती, निरनिराळे मतभेद, निरनिराळ्या भाषा व निरनिराळ्या लिप्या आढळून येतात. पैकीं धर्म, पंथ, जाती, मतभेद यांमधें या जगाची एकवाक्यता होण्याची कांही शक्यता असो वा नसो; पण एकभाषा–निदान एकलिपि होणें सहज शक्य आहे. आणि एकच एक गोष्ट अवश्य लक्षांत घेण्यासारखी आहे. ती ही, की वर उल्लेखिलेल्या प्रकारांना बहुतांशीं प्रमाणावर आळा बसवायचें का होईना, असेल–जागतिक स्वास्थाची मोठ्या प्रमाणावर आशा करावयाची असेल तर तें सामर्थ्य एकभाषेत–निदान एकलिपींत आहे हें खास!

– नी तिचें भीषण स्वरूप

प्रस्तुत प्रयत्न बहुसंख्याकांच्या हितासाठी आहे ही गोष्ट लक्षांत घ्यायला हवी. व्यक्तिशः आपण आपल्या सुखदुःखांकडे अनुभव या दृष्टीने पाहूं लागलों असतां आपल्याला आढळून येतें, की जोंपर्यंत आपणांला एकादी गोष्ट कळली नव्हती–तिची जाणीव झाली नव्हती–तिचें ज्ञान झालें नव्हतें तोंपर्यंत आपण फारच सुखांत होतों. आगामी संकटाची वा सुखाची कल्पना आपल्याला कुणी दिली तर आपण स्वीकृत कार्यापासून–निदान दैनंदिनीपासून ढळून बेचैन झालों होतों. थोडक्यांत 'पुष्कळदा अज्ञानांतच खरें सुख असतें' असें नेहमीच म्हणण्याची पाळी येते. परंतु आता 'तसं' अज्ञानीच राहाण्यासारखी परिस्थिति उरलेली नाही. आता जगाचें अनन्तत्व आपल्या डोळ्यांना चक्क दिसूं लागलें आहे. मात्र हें अनंतत्व आपल्या पूर्वजांनी वर्णिल्या स्वरूपापेक्षा निराळें बनत आहे असें दिसून येत आहे. अध्यात्मिक जगांत 'मानवधर्म, मानवधर्म' म्हणून त्यावेळच्या ज्ञान्यांनी जी महति गायिली–जो टाहो फोडला त्याच मानवधर्माला आजच्या विज्ञानयुगांत हरताळ फासला जात आहे. 'माणसाला माणसांसाठी पिंजरा तयार करावा लागला– तो त्यानं केला नि करविला' यांतच मानवधर्माचें अधःपतन आणि इतिश्री दिसत आहे. जगाच्या पाठीवर अजून अशी कांही ठिकाणें आहेत, की त्या ठिकाणच्या लोकांना मोटार किंवा सायकल ही काय चीज आहे हें माहीत नाही; वर्तमानपत्र त्यांच्या जगांत नाही; मग टेलिफोन, रेडिओ, सिनेमा अशांसारखी गोष्ट दूरच ! आणि जोंपर्यंत या गोष्टींचें सामान्य ज्ञान बहुसंख्याकांना होणार नाही तोंपर्यंत त्या बहुसंख्याकांवर मूठभर लोकांची सत्ता चालेल आणि ते अल्पसंख्याक असूनहि बहुसंख्याकांचे

ईश्वर राहातील. बरें, इतकेंहि करून कोणी उदार होऊन या बहुसंख्याकांना विज्ञानाच्या एकेका भागाचें का होईना, ज्ञान देऊं ह्मणेल तर बहुभाषा–भाषिकांचा प्रश्न त्यांना आडवा जातो. शिक्षण देणाऱ्याची भाषा एक तर शिक्षण घेणाऱ्याची दुसरीच. आणि असें ज्ञान द्यायला घ्यायला तर भाषेशिवाय–लिपिशिवाय दुसरें साधनच नाही नि तितकी सुलभताहि दुसऱ्या कशांतच नाही.

आपल्या नित्यकर्मांतहि आपणांला लेखन कलेला पुष्कळच महत्त्व द्यावें लागत आहे. साधे निरोप, आमंत्रणें, खुशाली, मतप्रचार, वृत्तप्रसार इत्यादि उत्तरोत्तर श्रेष्ठ प्रकारांची आपणांला हरघडी कमी आधिक जरुरी लागते. ज्याला तीनचार भाषा अवगत आहेत असा एकट्या दुकटा बहुजन समाजावर जुलमी सत्ता गाजवूं शकतो खरी; पण ती वितकीशी ताप दायक होऊं शकत नाही. दोनतीन भाषा ओळखणाऱ्याच्या ह्मणण्याला सारेजण मान तुकवतात; पण बहुजनसमाजाची एकुलती एक मातृभाषा जाणणारा मात्र त्यांचा देव होतो; बहुजनसमाजाला त्याच्याचपुढे तोंड वेंगाडण्याची पाळी येते. वरवर दिसायला हा क्रम विचित्र वाटला तरी सत्य आहे.

'गरजवंताला अक्कल नसते' या दृष्टीनें अडवणूक होणें ही गोष्ट गौण आहे; पण एरवी सुशिक्षित गणला जाणाराहि फसविला जातो. सावकार, पठाण आणि मारवाडी यांच्याकडून कर्ज काढतांना जास्त व्याजाच्या दराची कल्पना असली तरी शेवटी तो 'जास्त'च न राहातां 'जबर' ठरतो याचें कारण उघड आहे. धनको कर्ज देतांना आपल्या भाषेंत त्या कर्जाच्या अटी लिहून घेतो; उलट ऋणकोला त्या अटी लिहून देतांना भान न राहून स्वतःला न समजणाऱ्या भाषेला मान तुकवितो. कोर्टांत गेल्यावर मात्र त्याला या गोष्टी आठवूं लागतात. मग

निरक्षरांना तोंड द्याव्या लागणाऱ्या इतर क्षणिक सावकारांची गोष्ट दूरच; डॉक्टर, वकील, इतर जुलमी अधिकारी, गावगुंड अशांच्या सावलींत या बिचाऱ्यांना आपलीं प्रतिबिंबें पाहावीं लागतात. यावरून थोडक्यांत हें लक्षांत येईल, की हे आणि यांत न आलेल्या कांही भयंकर प्रकारांना आळा घालून बहुसंख्याकांची सोडवणूक करायची असेल तर परस्पर प्रत्येक व्यवहार एकभाषेंत—एकलिपींतच झाले पाहिजेत. एकलिपि झाल्याने प्रत्येकाला आपल्या परस्पर व्यवहाराचे धागेदोरे तरी संभाळतां येतील. थोडक्यांत, प्रथमतः परस्पर व्यवहार सुलभ व्हावे ह्मणून भाषा उत्पन्न केली गेली; पण ती आज अत्यंत स्वरूप घेतांच त्याच व्यवहाराला मारक ठरली आहे.

खरोखरीच हा वेडेपणा आहे काय ?

एकभाषेचा आणि एकलिपीच्या शक्याशक्यतेचा विचार करूं लागलें असतां तदंगभूत असा दुसराच प्रश्न उपस्थित होतो, की 'जग अतिशय सुधारलं आहे असं तुम्हीच कबूल करतां; मग सर्वांनी सर्वच भाषा शिकायला काय हरकत आहे ? निदान ज्याचं ज्या भाषेवांचून अडत असेल त्यानं ती भाषा शिकावी. उगाच एकभाषेचा नि एकलिपीचा बाऊ करून सर्व जगालाच वेडं ठरवण्याचा अट्टाहास न् उठाठेव कशाला करताय् ?'

मी म्हणतों, या प्रश्नाचें उत्तर वरच्या विवेचनांत आलेंच आहे. ज्यांची लिपि जगावर नांदत आहे असें आपण पाहातों, त्यांनाहि आज लिपि-शुद्धीची बोचणी लागून राहिली आहे. कोणताहि नियम नसलेली—वाटेल तशी आडवीतिडवी अस्ताव्यस्त पसरलेली Spelling ची कटकट त्यांची त्यांनाच जड झालेली आहे.

'अैकून अैकून बोलूं लागतो' या व्यवहाराने मनुष्य त्या त्या वातावरणांतून दुसऱ्या भाषा शिकूं शकतो; पण वाचनाखेरीज हें ज्ञान तो वाढवूं शकत नाही आणि वाचनासाठी त्याला त्या लिप्या शिकल्याखेरीज गत्यंतर नाही. याशिवाय लिपिज्ञान नसल्याने तर नुसत्या औचारिक ज्ञानाचा त्याला काडीचाहि उपयोग होत नाही — लिहिण्यावाचण्याच्या दृष्टीने इतरांइतक्याच सफाईने तोहि फसविला जाणें शक्य होतें. आणि नवीनवी लिपि शिकणें सर्वसामान्य माणसाला काळाच्या दाढेंतून सुटण्याइतकेंच भाग्याचें मानावें लागतें. अर्थात् हे सारेच फायदेतोटे संभाळून शास्त्रालाहि विशेष धक्के न देतां जागतिक पण चिरंजीव; सुलभ पण मनोहारी आाणि शुद्ध स्वरूप धारण केलेली कोणतीहि — प्रत्येक भाषा-बोधक लिपि आपल्याला शोधून काढावयास पाहिजे आहे.

आता साक्षरता-प्रचाराच्या दृष्टीने 'अक्षर ओळख' या मुद्याकडे पाहा. 'अक्षर-ओळख' ह्मणून आपल्याला (संस्कृतोद्‌भव भाषांचे) १३ स्वर आणि ३४—३५ व्यंजनें मिळून सुमारें ४८ अक्षरें शिकावीं लागतात. परंतु 'हीं ४८ अक्षरें 'मूळाक्षरें' ह्मणून तरी पुरीं पडतात काय ?' असा प्रश्न उत्पन्न झाला तर त्याला 'नाही' हेंच उत्तर द्यावें लागतें. बाराखड्यांची गोष्ट सोडली तर या ४८ मूळाक्षरांपासून होणाऱ्या जोडाक्षरांचीं रूपें पाहिलीं, की मनुष्य हतबुद्धच होऊन जातो. मनुष्याने स्वतःच्या सुखासाठी अल्पश्रमीं आाणि अल्पखर्ची म्हणून निर्माण केलेली लिपीच आज पिढ्यान्‌पिढ्या त्याचा जीव घेत आहे. ज्यांना गत्यंतरच नाही तेच 'निदान मातृलिपि' तरी शिकतात.

जोडाक्षरांचा हा मुद्दा कांही वेळ बाजूस सारून आपण आणखी एका मुद्याकडे पाहूं. या मुद्यांचा पांढरपेशांच्या दृष्टीने विचार केला तरी या

४८ ' अक्षरांची ओळख ' देतांना या ४८ खुणा कितीतरी अधिक वाटतात क, ख, ग, घ, ङ अशा तऱ्हेने– ' श्रीगणेशा ' पासून ' ज्ञ ' पर्यंत अंकलिपींत दिलेल्या पद्धतीने–उच्चारसौकर्य म्हणून ' अक्षर ओळख ' द्या; की ' ग, म, भ, न ' या लेखन–सौकर्य पद्धतीने ' अक्षर ओळख ' द्या; क, व, च, ब; र, व, ख; ट, ढ, द; इ, ह; अशा सादृश्य अक्षरांत ' अमूक अमूक कोणतें नी तमुक कोणतें ? ' असा प्रश्न उपस्थित होऊन हा एक कित्येक दिवसांचा गमतीचा गोंधळ होऊन बसतो....' लग्न ' या शब्दांत ' ग् ' ला ' न ' ' ग्न ' म्हणून सांगितलें तरी ' विघ्न ' या शब्दांत ' घ् ' ला ' न ' ' घ्न ' असें सांगावेंच लागतें. ' वृक्ष ' यांत ' व् ' ला ' ऋ ' ' वृ ' सांगितलें – फार काय ' कृष्ण ' यांत ' क् ' ला ' ऋ ' ' कृ ' सांगितलें तरी ' कृपण ' यांत ' क् ' ला ' ऋ ' ' कृ ' असेदेखील सांगावेंच लागतें; ' धृव ' यांतला ' धृ ' तर ' ध्रु ' असा लिहिला –छापला जातो. ' उच्छृंखल ' या सारख्या शब्दांच्या उच्चारांचे आणि लेखनांचे हाल तर विचारूंच नका ! ... जोडाक्षरांसाठी अक्षरें कापावीं आणि ठेंगणीं करावीं लागतात म्हणूनच जोडाक्षरांचा बागुलबुवा उत्पन्न झाला. अक्षरांचे पाय मोडून जोडाक्षरें लिहिणें हा मार्ग सुलभ आणि उत्तम आहे; पण अक्षरें कापून किंवा ठेंगणीं करून त्यांना दुसरीं अक्षरें जोडलीं की... साक्षरता – प्रचार म्हणून काँग्रेससारख्या मोठ्या संस्थेने आटोकाट प्रयत्न करण्याचें ठरविलें काय; हिंदी वृत्तपत्रांनी ' आमच्या पत्राला वाचकच नाहीत तर आम्हीं लेखकाना तरी कोठून मोबदला द्यावा ? ' अशी ओरड केली काय किंवा कोट्यवधि शाळा - कॉलेजेस् निघालीं काय – साऱ्यांच्याच नाड्या आंखडाव्यांत अशी मूळांतच सदोष वर्णांची ही लिपि आहे. (" ' अक्षर – ओळख ' कशी द्यावी ? " हा मुद्दाच येथे प्रस्तुत नाही.)

शिक्षकाचे—जा जो शिकवण्याच्या स्वरूपाच्या सूचना देतो—आणि शिकणाऱ्याचे हाल पाहिले, की मनापुढे विराट स्वरुपांत असा प्रश्न उभा राहतो, की 'मनुष्याने लिपि निर्माण केली ती स्वतःच्या सुख-सर्वस्वासाठी, की स्वतःला मरणप्राय दुःख होण्यासाठी ?' निदान चालू घटका तरी या प्रश्नांतल्या उत्तरार्धाकडे बोट दाखवित आहे. पांढरपेशांच्या दृष्टीने ही स्थिती आहे; मग बाकीच्या वर्गांचा विचार करण्याची जरूरच कोठे आहे ! त्यांतून ही 'अक्षर-ओळख' देण्याचे हल्लींचे नवेनवे प्रयत्न आणि वळु(वळ)ल्या पाहिल्या, की या वर्गांत पुन्हा (१) शहरी आणि (२) खेडी असे अतिशय मोठे असे दोन वर्ग तयार होतात आणि 'पूर्वी कांहीतरी बरं होतं' असे प्रतिगामी विचार उत्पन्न होऊं लागतात. आता 'त्यावरच कांही तोड नाही का ?—यांतल्या यांतच कांही सोय नाही का ?' असा 'सूज्ञपणा'चा विचारपूर्वक प्रश्न केल्यास 'विशाल दृष्टि केल्यास यावर यांतच तोड आहे—सोय आहे' असें उत्तर देतां येतें.

ही 'विशालदृष्टि' करतां आपणांस सहज कळून येईल, की 'या ४८ खुणांपैकी शक्य तितक्या खुणा कमी केल्या', की झालें ! '४८ खुणांपैकी शक्य तितक्या कमी खुणा असाव्या; त्या खुणा कमी करतांना अगर जोडाक्षरांची हकालपट्टी करतांना त्याच्या आड येणाऱ्या इतर शास्त्रीय आणि अशास्त्रीयहि गोष्टी बाजूला साराव्यात,' असें म्हणणें म्हणजेच 'विशाल दृष्टि' करणें होय. आणि आता पाहूया याप्रमाण आपणांला काय काय करतां येतें तें.

[१] (अ,) आ, इ, ई, उ, ऊ, ए, ऐ, ओ, औ, अं, अः या स्वरांकडे लक्षपूर्वक पाहिल्यानंतर (अ), ा, ि, ी, ु, ू, े, ै, ो,

ौ, ं, ः हे त्यांचे Representatives आहेत असें म्हटलें तर त्यांत बरीच विसंगति दिसते. मूळच्या खुणांत दोष तर आहेतच; पण त्यांच्या Representatives प्रमाणे जर त्यांचें रूप ठरवायचें असेल तर तें इि, इी, उु, उू, ऐ, ऐ असें हवें होतें; पण अ, वरून आ, ओ, औ, अं, अः एवढीं रूपें तयार केल्यावर इ, ई, उ, ऊ, ए, ऐ यांनीच तेवढा कोणता गुन्हा केला आहे ? उलट या स्वरांच्या आहेत या रुपांप्रमाणे त्यांचे Representatives कसे चुकीचे होतात हेंहि वर दाखविले आहेत. कारण (अ,) आ, ओ, औ, अं, अः यांचे जसे 'अ' गाळून शास्त्रोक्त पद्धतीने Representatives घेतां येतात तसे इि, इी, उु, उू, ऐ, ऐ यांतून (कारण यांत 'अ' नाही हेंच शास्त्र असल्यामुळे) शास्त्रोक्त पध्दतीनें ि, ी, ु, ू, े, ै, हे Representatives घेतां येत नाहीत. म्हणून इ, ई, उ, ऊ, ए, ऐ, यांचीं अनुक्रमें अि, अी, अु, अू, अे, अै हीं रूपें होतात. [२] 'शक्यतितक्या कमी खुणा ठेवणें' हें ध्येय समजल्यावर 'मूळस्वरांशिवायहि त्यांचे Representatives शिकणें' असा प्रसंग पाहिला की, या दोहोंचेंहि काम करणारा तिसराच मार्ग आपल्याला काढला पाहिजे असें ठरतें आणि तो म्हणजे मूळच्याच स्वरांमधें बदल करणें. उदा. 'इ' या उच्चाराच्या ऱ्हस्व आणि दीर्घ या दोन्हीकरिता 'इ' हीच खूण अनुक्रमें 'इ', 'इइ'; 'उ' ही 'उ', 'उउ'; 'ए' ही 'ए', 'एए' अशीं वापरणें. अर्थात् आ, ओ आणि औ यांकरिता दुसऱ्या कोणत्यातरी खुणा घेतल्या पाहिजेत. [३] ि, ी, े, ै यांना जशी काऱ्या (ा) ची मदत घेतली आहे तशी ु, ू, े ै यांनाहि कां घेतली नाही ? [४] ऱ्हस्व आणि दीर्घ अशा या स्वरांत दोन वाटण्या आहेत. उदा.– 'अ' ऱ्हस्व; 'आ' दीर्घ. 'इ' (ि) ऱ्हस्व; 'ई (ी)' दीर्घ. 'उ (ु)' ऱ्हस्व;

'ऊ (ू)' दीर्घ. आणि अशा तऱ्हेने पाहातां — अ किंवा आ (वास्तविक 'आ') + इ = ऐ (ऐ) आणि अ किंवा आ (वास्तविक 'आ') + उ = औ— आणि उच्चाराप्रमाणेहि पाहातां 'ऐ (ऐ)' आणि 'औ' यांचे 'इ' (ि सोयीकरिता ि) आणि 'उ' (ा उ) असेंच ठरतें. अर्थात् 'ो' ही खूण 'ए (ऐ)' ची आणि ची 'ो ो' अशी दीर्घ ह्मणन 'ओ' ची 'ो ो' असे Representatives ठरतात (ह्मणजे े, ै, ो, ौ, हें चूक आहे. पूर्वींच्या ौ, चें रूप ो ो असेंच हवें होतें उदा.— के, कै, को, को ो. [५] या 'ऱ्हस्व-दीर्घांच्या समजुतीसाठी निरनिराळ्याच खुणा घेतल्या पाहिजेत' असा कांही निसर्ग नाही; उलट "'ऱ्हस्वसाठी एकदा' आणि 'दीर्घसाठी दोनदा'" हाच मात्र निसर्ग-नियम ठरूं शकतो आणि आहेहि. (याप्रमाणे ऱ्हस्व-दीर्घ इ' साठी 'ी, ी ी'—ि, ि ि यांपेक्षा सोयी-साठी; आणि ऱ्हस्व-दीर्घ 'उ' साठी 'ु', 'ु ु' अशा अनुक्रमें खुणा ठरत आहेत—" 'ि, ु' या खुणा अक्षरांच्या मागे येऊन त्यांची 'ऱ्हस्वता' Shortness दाखवित नाहीत काय? आणि 'ी, ू' या खुणा अक्षरांच्या पुढे येऊन दीर्घताच दाखवीत नाहीत काय?" असा कोणी प्रश्न विचारतील; पण 'दोन्हीहि दृष्ट्या (दृष्टि) परस्परांइतक्याच शास्त्रीय आहेत' हेंहि त्याबरोबरच कबूल करावें लागेल आणि मग 'सोयीसाठी—त्यांतल्या त्यांत सोयीची—' ह्मणून पहिलीच मान्य केली पाहिजे.) [६] ा, ि, ी, ु, ू, े, ै, ो, ौ, ं, ः हे जसे बहुतेक स्वरांचे Representatives असून त्यांचा तसा उपयोगहि केला जातो तसे 'अ' आणि 'ऋ' या मात्र दोनच स्वरांना तेवढे कां नाहीत? निदान त्याच रूपांत तरी 'अ' चा उपयोग कां केला जात नाही?...अशा शंका पदोपदींच डोकावतात.

छापखान्यांच्या दृष्टीनेहि याचा विचार झाला पाहिजेच. संस्कृतोद्भव सर्वच लिप्यांची रचना एकाच तत्त्वावर–एकाच पद्धतीने झाली आहे; ह्मणजे चार दोनच खुणांचा फरक ठेवून काना, वेलांटी, उकार, मात्रा, रफार, ट्रकार वगैरे सर्वसाधारण; आणि जोडाक्षरांकरिता कापलेल्या, पाय मोडलेल्या आणि ठेंगण्या खुणा एकाच पद्धतीने–जशा ज्या ठिकाणीं एका लिपींत लिहिल्या अगर जुळविल्या जातात तशाच त्या त्याच ठिकाणीं दुसऱ्या आणि सर्वहि लिपींत लिहिल्या आणि जुळविल्या जातात. तऱ्हा कोणत्याहि एका लिपीचे गुणदोष दाखविले, की ते सर्वांनाच लागू आहेत असें समजलें, की झालें !

'वळण या दृष्टीने नागरीच लिपि सुंदर आहे' या ह्मणण्याला कोणाचा सप्रयोग विरोध होईल असें मला वाटत नाही. आतापर्यंत तरी हें ह्मणणें मान्य झालेलेंच आहे. अर्थात् ती एकलिपि होण्याला लायक आहे, हें उघड ठरलें आहे; मात्र तिचें शुद्ध स्वरूप बनविलें, की झालें. अर्थात् याप्रमाणे पाहातां सर्वांनीच ही महत्त्वाची गोष्ट लक्षांत घेतली पाहिजे, की आज प्रत्येकाने एकलिपीची आवश्यकता पटवून घेऊन आपल्याच नागरी लिपीपुढे प्रांतिक लिपीचा–मातृलिपीचा ह्मणा अभिनिवेश धरून यापुढे तरी प्रगति होणार नाही (हा भाषेचा नसून लिपीचा प्रश्न आहे !!!) !—नाहीतर मागेच राहावें लागेल !!!

केवळ लेखन–कलेवर उपजीविका करणारे-तरे म्हणजे सर्वच माझा हा मुद्दा एकमताने मान्य करतील ही मला खात्री आहे; तरी कांही लोकांच्या समाधानासाठी–यांना लेखनकलेची–नव्हे छापण्याच्या कलेची कल्पना व्हावी म्हणून जरूर ती पण थोडक्यांत माहिती पुरवावी म्हणून प्रत्यक्ष पुरावाच देतों—

संस्कृतोद्भव भाषांच्या लिप्यांसाठी (त्याला 'डिग्री–टाइप' ह्मणतात.)

ऱ्हस्व उकार — कु खु गु घु ङु चु छु जु झु ञु टु ठु डु ढु णु तु थु दु धु नु पु फु बु भु मु यु रु लु वु शु षु सु हु ळु क्षु ज्ञु

दीर्घ उकार — कू खू गू घू ङू चू छू जू झू ञू टू ठू डू ढू णू तू थू दू धू नू पू फू बू भू मू यू रू लू वू शू षू सू हू ळू क्षू ज्ञू

मदतनीस — ा ि ी ॆ े ै ॅ ॉ ो ौ ं ँ ् ॑ ॒ ॓ ॔

जोड — क्र, च्र, ज्र, ट्ट, ठ्ठ, ड्ड, ढ्ढ, त्त, द्द, न्न, ल्ल,

,, क्र ग्र, घ्र, ज्र, त्र, द्र, घ्र, प्र, ब्र, भ्र, म्र, व्र, स्र, ड्र,

,, कृ, गृ, घृ, जृ, तृ दृ, धृ, नृ, पृ, वृ, भृ, मृ, वृ, ष्ट, ष्ठ,

स्वतंत्र — श्र, ह्न, श्व, रु, रू, क्त, स्न, द्व ध्न, द्य, क्व, भ्य, द्ध त्त, द्र, ह्य, क्ल, ह्म, न्द, हृ, ह्ल इत्यादि.

अशा प्रकारें पूर्वी ही अक्षरांची संख्या ६४५ भरत असून त्यांसाठी १९२ (अप्पर केस) + ९९ (लोअर केस) अशीं घरें होतीं. सध्या ही संख्या ३८५ वर आणली असून त्यांसाठीं १२८ (अप्पर केस) + ९९ (लोअर केस) घरें आहेत. या दोन्ही केसमधल्या बहुतक घरांत दोन दोन टाईप असतातच; पण कित्येकांत याहिपेक्षा अधिक असतात. एके ठिकाणीं तर ९ अक्षरें आहेत; तर दुसरे ठिकाणीं १२ आहेत. ह्मणज हवें असलेलें अक्षर (खिळा) शोधण्यांतच किती वेळ जात असावा ?

पाहा, होईल याचा ऑटोमॅटिक् कंपोझ ? यतील या मोनो-टाइपवर बसवतां ? होईल का यांच्यापासून Tele-printing ? Tele-printing आणि Automatic Compose करण्यांचें जणू वरदानच मिळालेल्यांना-देखील या जाहिरातीच्या युगांत स्वतःच्या लिपि-शुद्धीची निकड भासत आहे. दुसऱ्यांच्या भाषांचा आधार न घेतांहि 'टाइम्स' ग्लेझ कागद वापरून

१ आण्यांत २४ पानें देऊं शकतो, त्याच आकारांत साधीं ४ पानेंहि आमच्या वृत्तपत्रांना स्वभाषियांना देतां येऊं नयेत, हा कशाचा परिणाम! सार्व-भाषिकतेचा नसून लिपि-दुर्बलतेचाच परिणाम नाही काय? आमच्याच लिपीबद्दल आम्हांला औदासिन्य तरी कां वाटावें?...... हा दोष आमचाच, की आमच्या लिपीचा?... हा आमचा दोष असेल तर काय करायला हवें आणि लिपीचाच असेल तर त्या करितां......?

(अप्पर केस मधल्या कित्येक घरांत दोन दोन तीन तीनहि खुणा असतात हें लक्षांत आलें असेलच!) वृद्धयर्थ, मूर्घ्नि, पश्च्यां, श्रद्धत्स्व, द्दष्ट्वा, उक्त्वा, अन्वेष्टुं, दारिद्र्य, उच्छ्रिता अशा प्रकारच्या शब्दांचे उच्चार आणि छापखान्यांतील लोकांकडून कंपोझिंग व्हावें कसें? शब्दांतील एकाद्या अक्षरावर जरी वेलांटी, मात्रा अगर रफार आला, तरी बाकीच्या सर्व अक्षरांवर त्या त्या अक्षरांच्या रुंदीच्या डिग्या बसवाव्या लागतात. आणि कंपोझिंगमधे तर हीच अत्यंत क्लिष्ट—त्रासाची आणि वेळखाऊ गोष्ट आहे. ह्या डिग्यांत टाचणीपेक्षाहि बारीकपणापासून अर्धा इंचापर्यंत दुपटीच्या प्रमाणांत हे आकार वाढून त्यांची संख्या तेरा होते. ह्या डिग्यांवरच कंपोझिंग खिळखिळा होणें, मात्रा, वेलांट्या, रफार मागेपुढे सरकून अर्थाची हानि होण्याचें अवलंबून असतें. आणि 'द्दष्ट्वा' सारख्या शब्दांत मूळच्या जोडाक्षराला आणखी एकादें अक्षर जोडण्याची वेळ आली, की त्यापुढच्या ओळीपूर्वी तर एका ओळीची जागा सोडावी लागतेच; पण तो शब्द ज्या ओळींत त्या ओळीच्या पुढच्या अगर मागच्या दोनचार ओळींमधे आणखी एका ओळीची जागा सोडावी लागते. आणि संस्कृत, कानडी, मल्याळीसारख्या भाषा तर अशाच शब्दांच्या बनलेल्या आहेत. दुसरी गोष्ट, 'कृपा' शब्दाचा उच्चार जेथे

'किरपा ' असा अर्थशून्य आणि त्याहिपेक्षा कर्णदुष्ट होतो तेथ वरच्या-सारखे शब्द कोठे ठेवायचे!!!

लोअर केसमध्ये शेवटल्या ओळीमधल्या चार घरांत 'डिग्ऱ्या' असतात. ह्यांतल्या एका घरांतली ' डिग्री ' बारीकांत बारीक टाचणीपेक्षांहि बारीक असते. ज्या ज्या अक्षरावर वेलांटी, मात्रा, अनुस्वार, काना, रफार येईल, त्या त्यांच्या पूर्वीच्या अक्षरावर त्याच्या रुंदीची डिग्री बसवावी लागते. ('व' पेक्षा 'क'; 'इ' पेक्षा 'ङ्ख'; 'प' पेक्षा 'फ'; 'र' पेक्षा 'स'; 'द' पेक्षा 'क्ष' रुंद-जाड असतात; शिवाय पुढे काना आला की ही रुंदी वाढते;) (१) ह्या ' डिग्ऱ्या ' बसविणें आणि (२) इतक्या घरांतून हवी ती खूण काढून घेण्याकरिता दृष्टि आणि हात सज्ज ठेवणें या दोन गोष्टींत बिचाऱ्या कंपॉझिटरचे हाल......ह्या टाइपाची १ ओळ कंपोज करीपर्यंत इंग्रजी कंपोज १० ओळींचा होतो.

इंग्रजीमधे स्मॉल आणि कॅपिटल असा फरक नसता तर मूळ २७ अक्षरें, विरामचिन्हें, इतर कांही हव्या तशा कमी जास्त खुणा मिळून हो ५० एक खिळ्यांची—अर्थात् तितक्याच घरांची ही संख्या होते. (ह्यांना 'डिग्ऱ्या (!)' लागत नाहीत.)

डिक्शनरींचें जग नी उद्याची घटका

इंग्रजीमधे एकाद्याला आपला विषय सोडून शब्द लिहायचा असला तर त्याला ' डिक्शनरी ' पाहावी लागते. ' केमिस्ट 'ला ' सायन्स 'मधला शब्द; ' सायंटिस्ट 'ला 'मेकॅनिक'मधला शब्द; ' मेकॅनिक 'ला वाङ्मयांतला शब्द; वाङ्मयलेखकाला ' केमिस्ट्री 'मधला शब्द—असे आपलें क्षेत्र सोडून दुसऱ्याकडचे शब्द लिहायचे झाले तरी या इंग्लिश लोकांना आपलीच भाषा लिहितांना हाल भोगावे (Dictionaries) लागतात. मग इतरांचे

हाल काय पाहाव ! ना. गोखल्यांनी कित्येक दिवस Times चे अग्रलेख पाठ केले तेव्हा त्यांना इंग्रजीवर प्रभुत्व गाजवितां आलें म्हणतात !!! यावरून सर्वांच्या लक्षांत आलें असेल, की हिंदुस्थानांतच हा प्रश्न उद्भवला नसून साऱ्या जगालाच त्याची अत्यंत जरुरी आहे.

आता प्रश्न हा, की एकलिपि खरोखर फायद्याची होईल काय ? आणि त्या फायद्याचें प्रमाण काय पडेल ?— एकदा एकलिपीची निश्चिति झाली, की सारेजण हौसेनं आणि तत्परतेने शिकतील. एकलिपि हें सर्व भाषांना सुलभ माध्यम झाल्याने कोणालाहि इतर कोणत्याहि भाषांचा ' बाऊ ' वाटणार नाही; इतर शक्य तितक्या अधिक भाषा शिकण्याचे ते प्रयत्न करतील आणि अशा रीतीने झपाट्याने जागतिक साक्षरतेचें प्रमाण वाढेल. साक्षरतेच्या प्रमाणाबरोबरच त्यांना ज्ञानाचाहि संग्रह करतां येईल (ज्ञानाच्या संग्रहाने सर्वांचेंच जीवन सुखमय होईल हें सांगणें नलगे !). प्रत्येक व्यवहारांत आणि कोर्ट-कचेऱ्यांतून एकलिपीचें मध्यम झाल्याने बहुजन समाज फसवाफसवीच्या त्रासांतून सुटेल. गरजवंत आपल्याला न समजणाऱ्या भाषेच्या मजकुरांत गोवला जात असला तरी एकलिपीच्या साह्याने त्या मजकुरांचे संबंध त्याला आपल्याजवळ बाळगतां येतील. शुद्धाशुध्द आचार-विचारांचें सारासार प्रमाण त्यांना शोधन (समजून) घेतां येईल; तसेंच रोगोत्पत्ति व त्यांचा नाश या सारख्यांचें परस्पर कारण त्यांना कळून त्याप्रमाणे राहणींत कमीजास्त बदल घडवितां येईल. आज सर्वस्वी हताश वाटणाऱ्या जीवनांत प्रत्येकाला आपापल्या मगदुराप्रमाणे आनंद निर्माण करतां येईल वगैरे वगैरे.

यानंतर ओघानेच हेंहि आलें, की मग या बाकीच्या लिप्यांचें काय करायचें ? आहे, त्यांनाहि जागा आहेत. एक गुपितांसाठी तर दुसरी

'म्युझियम'. अर्थात् पहिली जागा सर्वमान्य आणि कायद्याला धरून नाही हें लक्षांत ठेविलें पाहिजे. उलट गुपितांसाठी कांही ठराविक उपयोग करतां येईल. उघड व्यवहाराला तर बंद राहिली पाहिजे. याप्रमाणे या जुन्या लिप्या 'म्युझियम'मध्ये गेल्या, की दुसरा मोठा हा फायदा होईल, की जुने धर्मग्रंथ, पुराणे, शास्त्र, इतिहास हे नव्या स्वरुपांतून प्रकट करतांना त्यांचें मंथन करायला अवधि मिळेल. असो !

सारेच महत्त्वाचे निकष !

आता शेवटचा पण सर्वांत महत्त्वाचा मुद्दा हा आहे, की सध्याच्या चालू लिप्यांपैकी कोणती लिपि एकलिपि होण्याच्या योग्यतेची आहे ? आणि कां...?

याठिकाणीं एक आक्षेप येण्यासारखा आहे, की एकलिपि झाल्यावर तिच्यांत लिहिलेला मजकूर कोणत्या भाषेत आहे हें कसे ओळखायचे ?— पण ही गोष्ट तर अतिशय सुलभ आहे. एरवी तरी आपण सर्व लिप्या थोड्याच पाहिल्या असतात, की 'ही अमूक एक लिपि आहे' असें आपण सांगू शकतों ? दुसरी गोष्ट, एकलिपींतला मजकूर आपल्याला अर्थाच्या दृष्टीने समजत असेल तर ती कोणत्या भाषेकरिता आहे हें आपणांला सांगतां येईलच. तिसरी गोष्ट, ह्या एकलिपींत लिहिणाऱ्यानेच मुळी तोवर त्या भाषेचा उल्लेख केला, की झालें !

ह्या एकलिपीची योग्यता ठरवण्यासाठी—तिचा Formula बनविण्यासाठी पुढील नऊ गोष्टींकडे बारकाईने लक्ष पुरवलें पाहिजे. कारण आजच्या धकाधकीच्या काळांत टिकून पुढेहि तिला इतर संकटांना तोंड देण्याची तिची तयारी पाहिजे (१) टेलि-प्रिंटिंग झालें पाहिजे.

(२) ॲटोमॅटिक कंपोझ करतां आला पाहिजे (३) मोनो-टाईप झाली पाहिजे. (४) ती वर्णमाला Type-writer वर बसवतां आली पाहिजे. (५) ध्वनीचीं निश्चित् केलेल्या मूलगामी स्वरूपाची शक्य तितकी अल्प-संख्या असली पाहिजे. (६) लघुलेखन – Short-hand झालें पाहिजे. (७) हातांनीं लिहितांना शक्य तों अखंड चालणारी. (८) हातांनी कंपोझ करतां तोहि जलद झाला पाहिजे. (९) सुंदर वळण असलें पाहिजे.

शेवटचा मुद्दा शक्यतों न सोडतां आपल्याला हा प्रश्न सोडवायचा आहे. आता उरलेल्या सात मुद्यांकडे विचारपूर्वक पाहूं लागलों, की त्या सर्वांतूनच एक मुख्य उत्तर निघतें, की वर्णसंख्या कमी झाली पाहिजे. [१] ॲटोमॅटिक कंपोझ होण्याची किल्ली सापडली, की वर्णसंख्या कमी करण्याच्या प्रयत्नाकडे दुर्लक्ष होण्याचा खास संभव आहे; उलट वर्णसंख्या जितकी जास्त तितका या पद्धतीला अडथळाच जास्त दुसरी गोष्ट, जोंपर्यंत एकीपुढे दुसरी खूण ठेवून लिपि तयार होत आहे, तोंपर्यंत उच्चारासाठी एकीवर अवलंबून असणाऱ्या तिच्या वरच्या अगर खालच्या (वेलांट्या, मात्रा, उकार, अनुस्वार, रफार, ऋकार इत्यादि) खुणा त्या पहिल्या खुणेशी सलग (अखंड) असल्या पाहिजेत. काना, वेलांट्या, उकार, मात्रा, रफार इत्यादि खुणांमुळे-विशेषत: त्या अलग (डिग्रीटाइप) असल्या तर मुख्य दोन दोष उत्पन्न होतात. [१] ह्या खुणा इकडे तिकडे सरकू शकतात; कदाचित् कंपोझ करतांनाच त्यांची जागा बदलली जाते. [२] ह्या खुणा मुख्य खुणांपेक्षा लवकर झिजत असल्याने कार्यपूर्तीपेक्षा कार्यनाशालाच कारण होतात. [२-३] मोनो–टाईपसाठी प्रत्येक खुणेची सारखी रुंदी पाहिजे. (दोनदोन तीनतीन Shiftkeys ठेवून चालू वर्णसंख्या टाइप-रायटरवर बसविणें कौशल्य नसून तो टेलि प्रिंटिंग (Tele-printing) ला

एक मोठाच अडथळा आहे. वृत्त-जगांत अत्यंत महत्त्वाचे, तर हीच गोष्ट आहे.) (४) सुलभता साधूनहि त्या लिपीला जागतिकता आणि अबाधित्व-चिरंजीवित्व यावें ह्मणून शक्य तितकी अल्पसंख्या असली पाहिजे. कारण या गोष्टीमुळे जशी लेखनाची—छापण्याचीहि तशी वाचनाची—पर्यायाने साक्षरतेचीहि सोय होईल. (५) लघु-लेखना (Short-hand) ला-देखील Tele-printing च्या इतकेंच महत्त्व वृत्तपत्राच्या जगांत आहे. उलट Tele-printing आणि Short-hand यांच्या मिलाफाने कोणत्याहि वृत्तपत्राला जागतिक महत्व दूर नाही. (६-७) ह्या मुद्यांचा विचार करतांना नैमित्तिक पण किरकोळ लेखन आणि छापणावळ (निरोप, आमंत्रणें, घरगुती पत्रव्यवहार, कामचलाऊ हिशेब) अशी दृष्टि ठेवायची असेल, तर कांही अधिक बोलण्याची आवश्यकता नाही पण वृत्तपत्राच्या व्यवसायासाठी; मोठमोठे शास्त्रीय ग्रंथ निर्मित्या विद्वानांसाठी; निरनिराळ्या प्रकारचें पण विपुल लेखन करणाऱ्यांसाठी आणि व्यापाराच्या व्यापासाठी जें लेखन आणि छापणावळ व्हायची त्यांसाठी मात्र जलद-लिपि आणि जलद-छापजुळणी अत्यंत अवश्य आहे.

हिंदुस्तानाकरिता येथेच नागरी, उर्दू, कानडी, तेलगू, तामीळ, गुजराथी, बंगाली या लिप्या महत्त्वाच्या असून त्यांचा येथे विचार करावयाचा आहे. पैकी नागरीचा विचार केला, की गुजराथी, बंगाली आणि (जवळजवळ) कानडी यांचा विचार केल्यासारखें होईल. कारण या सर्वांची वर्णसंख्या, कंपोज करण्याची (काना, मात्रा, वेलांटि, उकार, अनुस्वार यांची कटकट) पद्धति आणि हातीं लिहिण्याचें वळण सारखेंच आहे. उलट गुजराथी, बंगाली या लिप्यांना अक्षराच्यावर आडवी रेघ नसल्यामुळे नागरीपेक्षा त्या हाती लिहिण्याला अवघड आहेत. कानडीचें

घळण इटॅलिक लिपीसारखें वाटलें तरी – त्यांत कानायुक्त, वलांटीयुक्त, मात्रायुक्त अशीं स्वतंत्र अक्षरें जशीं असतात, तशीं सुटींहि असतात; पण त्यांना त्या त्या प्रत्येकासाठी प्रत्येक वेळीं हात उचलावा लागतो. उर्दू लिपीमध्ये जरी गुजराथी लिपि लिहिण्यासारखा हात उचलावा लागतो तरी प्रत्यक्ष नागरीपेक्षा हात भरभर चालावा अशी तिची रचना आहे खास ! मात्र ती सर्वस्वी सौंदर्याला मुकली आहे.

आपल्याकडल्या मोठमोठ्या विद्वानांनी नागरी लिपीची श्रेष्ठता ठरवितांना तिचे जे गुण गायिले आहेत त्यांपैकी मुख्य गोष्टींकडे पाहून तशी आवश्यकता वाटलीच तर इतर गोष्टी लक्षांत घेऊन तशी चर्चा करावी.

नागरी लिपीचें [१] वळण सुंदर आहे [२] प्रत्येक उच्चाराकरिता स्वतंत्र अक्षर (खूण) आहे. [३] प्रत्येक उच्चाराला निश्चित्पणा आहे. [४] लिखाणांत जलदपणा आहे. हे चार मुख्य गुण सांगितले आहेत.

वरील चार गुणांपैकी पहिला सर्वस्वीं मान्य आहे. चौथा बव्हंशी मान्य आहे. दुसरा आणि तिसरा गुणच नागरी लिपीला घातक झाला आहे ही गोष्ट अजून कुणाच्याहि कशी लक्षांत आली नाही याचेंच आश्चर्य वाटतें. कारण तिसऱ्या मुद्यामुळेंच दुसरा मुद्दा उपस्थित झाला. (१) प्रत्येक उच्चाराच्या स्वतंत्र खुणेला निश्चित्पणा दिल्यानेंच प्रत्येक उच्चाराकारता स्वतंत्र खुण निर्माण करावी लागली. (२) काना, वेलांटी, उकार, मात्रा आणि अनुस्वार या मात्र नियमाच्या विरुद्ध उच्चार-हीन खुणा उत्पन्न करण्याचा नवाच खटाटोप करावा लागला. (३) जोडाक्षरांसाठी ' अर्धा उच्चार ह्मणून अर्धें अक्षर ' हा निसर्ग नियम धरावा लागला ...सर्व अक्षरें

